# वसई–विरार शहर महानगरपालिका

**वैद्यकीय आरोग्य विभाग–राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान**

**मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर**

**थेट मुलाखती (Walk-in Interview)**

जा. क्र. : वविशम/वैआवि/३०/२०१९ — दि. २०/११/२०१९

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक खालील संवर्गातील अस्थायी स्वरूपातील पदे करार पद्धतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात भरावयाची आहेत. याकामी NUHM सन २०१९-२० च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यास (PIP) अधीन राहून तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८, दि. २०.०४.२०१८ अन्वये मान्यता दिलेली असून विहित अर्हताप्राप्त उमेदवारांच्या थेट मुलाखती (Walk-in Interview) आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीस खालील पदनामानुसार नमूद केलेल्या दिवशी वसई-विरार शहर महानगरपालिका, चौथा मजला, महानगरपालिका बहुउद्देशीय इमारत, प्रभाग समिती 'सी' कार्यालय, विरार (पूर्व) येथे आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित सत्य प्रतींसह विहित नमुन्यातील भरलेल्या अर्जासह उपस्थित राहावे. अर्जाचा नमुना वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१) वैद्यकीय अधिकारी (पूर्ण वेळ)- एम.बी.बी.एस. (ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. ४५,०००/- + मनमामार्फत रु. ३,७४४/- असे एकत्रित रु. ४८,७४४/-)

| अ. क्र. | तपशील | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ८% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | ९% | १३% | १०% | २५% | १००% |
| १ | एकूण भरावयाची पदे | ० | २ | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | १ | ३ | १० |

२) वैद्यकीय अधिकारी (अर्ध वेळ) - एम.बी.बी.एस. (ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. २८,०००/-)

| अ. क्र. | तपशील | अराखीव १००% |
|---|---|---|
| १ | एकूण भरावयाची पदे | २१ |

३) औषध निर्माता (ठोक मासिक मानधन शासनामार्फत रु. १०,०००/- + मनपामार्फत रु. ८७९२/- असे एकत्रित रु. १८७९२/-)

| अ. क्र. | तपशील | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ८% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | ९% | १३% | १०% | २५% | १००% |
| १ | एकूण भरावयाची पदे | २ | ४ | १ | १ | ० | ० | ० | २ | ३ | २ | ४ | १९ |

यांचे ११ महिन्यांच्या करार पद्धतीने पदे भरणेकामी थेट मुलाखती (Walk-in Interview) घेणे कामी.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतीमाहे मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्ण वेळ)- एम.बी.बी.एस. | एम.बी.बी.एस. व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा ६१ वर्षे. | रु. ४८,७४४/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी (अर्ध वेळ) एम.बी.बी.एस. | एम.बी.बी.एस. व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र. | सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा ६१ वर्षे | रु. २८,०००/- |
| ३ | औषध निर्माता | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (विज्ञान) शाखा उत्तीर्ण आणि औषध निर्माण शास्त्रातील पदविका (डी.फार्म.), फार्मसी कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | ३८ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिल. | रु. १८,७९२/- |

मुलाखतीस येताना अर्जदाराने मूळ प्रमाणपत्रे सोबत आणावीत. तसेच अर्जासोबत खालील क्रमाने प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात-

१) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र (१० वी + १२ वी + पदनामासाठी विहित अर्हता प्रमाणपत्र).
२) पदनामानुसार आवश्यक असलेले महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल/महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र.
३) शाळा सोडल्याचा दाखला.
४) रहिवासी दाखला.
५) अनुभवाचे प्रमाणपत्र.
६) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत जातीचा दाखला.
७) जात वैधता प्रमाणपत्र.
८) उमेदवाराचे नजीकच्या काळातील २ रंगीत फोटो (रुंदी ३.५ सें.मी. व उंची ४.५ सें.मी. आकाराचे)
९) खुल्या प्रवर्ग उमेदवारांनी रुपये ५००/- चा डीमांड ड्राफ्ट 'Vasai- Virar Citiy Municupal Corporation's Integrated Health & Family Welfare Society' या नावाने सोबत जोडणे बंधनकारक आहे.
१०) प्रवर्ग अ. जा./अ.ज./विजाअ/भजब/भजक/भजड/विमाप्र/इमाव/एसईबीसी/ईडब्ल्यूएस उमेदवारांनी रुपये ३५०/- चा डीमांड ड्राफ्ट 'Vasai- Virar Citiy Municupal Corporation's Integrated Health & Family Welfare Society' या नावाने सोबत जोडणे बंधनकारक आहे.

**विशेष सूचना :-**

१) वरीलप्रमाणे देण्यात आलेली वयोमर्यादा ही दि. २८.११.२०१९ रोजीची गणली जाईल.
२) मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा शासन निर्णयाप्रमाणे शिथिलक्षम राहील.
३) नेमणुकीबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
४) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नेमून दिलेल्या कोणत्याही दवाखान्यात/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावर/रुग्णालयात/वैद्यकीय आरोग्य विभागात काम करणे बंधनकारक राहील. तसेच महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या वरिष्ठांकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांप्रमाणे कामे करणे बंधनकारक राहील.
५) तक्त्यात दर्शविलेल्या पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.
६) मागासवर्गीय उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
७) सदर पदभरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांव्यतिरिक्त उर्वरित सर्व कागदपत्रे फक्त तीन महिन्यांपर्यंत महानगरपालिकेकडे उपलब्ध राहतील.
८) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ठोक मानधनावर १) वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ)- एम बी.बी.एस., २) वैद्यकीय अधिकारी (अर्धवेळ), ३) औषध निर्माता या पदांकरिता मा. आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई यांच्याकडील मार्गदर्शक सूचनांनुसार मुलाखत घेऊन गुणांकनाची पद्धत अवलंबली जाईल.
९) निवड यादी गुणानुक्रमे प्रसिद्ध करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारांव्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.
१०) प्रतीक्षा यादीची विधिग्राह्यता एका वर्षाची असेल. निवड झालेले उमेदवार रुजू न झाल्यास सदर पद प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधून भरण्यात येईल.
११) वि.जा.भ.ज.-१ पदाचा अनुशेष सामान्य प्रशासन विभागाकडील दि. २९ मे २०१९ च्या परिपत्रकात दिलेल्या कार्यपद्धतीनुसार भरण्यात येईल.
१२) सदर पदांचा ११ महिन्यांचा कालावधी दि. ३१ मार्च २०२० पर्यंत असेल.
१३) वरील तक्त्यात नमूद केलेल्या पदांच्या मुलाखती खालीलप्रमाणे नमूद दिवशी घेण्यात येतील.

| अ. क्र. | पदनाम | थेट मुलाखतीचा दिनांक | थेट मुलाखतीचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) एम.बी.बी.एस. | २८.११.२०१९ | **सर्व पदांसाठी**<br>१) अर्ज स्वीकारण्याची वेळ :- सकाळी ९.३० ते १०.३० |
| २ | वैद्यकीय अधिकारी (अर्धवेळ) एम.बी.बी.एस. | २८.११.२०१९ | २) अर्ज छाननीची वेळ : सकाळी ९.३० ते १०.३० |
| ३ | औषध निर्माता | २८.११.२०१९ | ३) मुलाखतीची वेळ : सकाळी ११.०० पासून पुढे |

**ठिकाण : विरार पूर्व**
**दिनांक :- ....................**

सही/-
**अतिरिक्त आयुक्त (वैद्यकीय आरोग्य),**
**वसई–विरार शहर महानगरपालिका**